# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. २४/०५/२००५

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा मंगळवार दिनांक २४/०५/२००५ रोजी सभा सुचना क्र. ०३ दि. २०/०५/२००५ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मोहन पाटील हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मोहन मधुकर पाटील | सभापती |
| २) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | सदस्य |
| ३) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सदस्य |
| ४) | श्रीम. रिटा सुभाष शहा | सदस्या |
| ५) | श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर | सदस्य |
| ६) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| ७) | श्री. जोजफ जॉन घोन्सालविस | सदस्य |
| ८) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ९) | श्री. मिलन गोविंद पाटील | सदस्य |
| १०) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| ११) | श्री. केशव रामभाऊ घरत | सदस्य |
| १२) | श्रीम. जानी कैलाशबेन दिनेशचंद्र | सदस्या |

**गैरहजर सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| २) | श्रीम. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे स्वागत करून आजच्या सभेच्या कामकाजाला प्र. सचिवांनी सुरूवात करावी.

( प्र. सचिवांनी विषय पत्रिकेचे वाचन केले )

( प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १४ चे वाचन केले)

**रिटा शहा :-**

सभापती साहेब, ह्यावेळेला इतिवृत्तांत देण्यात आलेले नाही.

**मा. सभापती :-**

मी इतिवृत्तांताचा विषय ह्या सभेला ठेवलेला नाही.

**मिलन पाटील :-**

अध्यक्ष महाशय साहेब, ही वाचनालयाची फी आपण जी वाढवतो, ते प्रशासनाचे म्हणजे महानगरपालिकेचे उत्पन्न वाढीच्या बाबतीत ठिक आहे. परंतु फी किती वाढणार आहे आणि हे कसले विषय आले. ह्याला विषय बोलतात का? साहेब, तिथे पत्ते वगैरे काही खेळत नाही, गेम खेळतात का? आपण विद्यार्थ्यांवर पैसे वाढवतात महानगरपालिकेला अर्थिक उत्पन्न वाढविण्याकरीता दुसरे काही सोर्स नाही का? हे आपण पाच-पाच, दहा-दहा रूपये, चार-पाचशे रूपये वाढवतात. जर दोन तासभर जे.सी.बी. तिथे गेले तर शे-पाचशे रूपये वाढतील एक तासाचे तिथे आर्थिक उत्पन्न मिळते तिथे आपण घ्या. हे आपण पाच-पाच, दहा-दहा रूपये विद्यार्थ्यांचे वाढवायचे, गरीबांचे त्याला काय अर्थ आहे?

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, एकूण वाचनालये किती आहेत? साहेब काही अधिकारी आहेत त्यांनी पुस्तके घेऊन गेलेले आहेत आणि परत केलेले नाही.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्यांचा विषय असा आहे की, जो विषय आहे त्याच्यात वाढ करायची की नाही?

**मिलन पाटील :-**

वाढ द्यायची नाही.

**मा. सभापती :-**

सदरचा विषय नामंजूर करण्यात येत आहे.

**गजानन भोईर :-**

सभापती महोदय, वाचनालयाचे अधिकारी कुठे आहेत?

**मा. सभापती :-**

विषय आल्यावर त्याच्यावर चर्चा करू या.

**प्रेमनाथ पटील :-**

वाचनालयय किती आहे त्याची माहिती सभागृहात मिळत नाही.

**मा. सभापती :-**

सदरचा विषय आता नामंजूर करण्यांत येत आहे. नंतर हा विषय आल्यावर ह्या विषयावर चर्चा करावी. किती वाचनालय आहेत, काय आहे ह्याची माहिती घेऊ.

**गजानन भोईर :-**

रितसर हा विषय पुढच्या सभेत घेण्यात यावा.

**मा. सभापती :-**

सविस्तर माहितीसह सदरचा विषय पुढच्या सभेत घेण्यात यावा.

**प्रकरण क्र. १४ :-**

वाचनालयच्या फी मध्ये सुधारणा करणे बाबत.

**ठराव क्र. १६ :-**

मा. सभापती सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा विषय पुढील सभेत घेण्याचे ठरविण्यांत आले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १५ चे वाचन केले.)

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, मला अशी पाहिजे की औषधावर सुट देणेबाबतचा विषय मा. स्थायी समिती या मा. महासभेत झालेला होता.

**मिलन पाटील :-**

त्याची आम्हाला काहीही माहिती देणेत आलेली नाही.

**गजानन भोईर :-**

औषधावर सुट देण्याचा विषय केव्हाच्या स्थायी समितीमध्ये झालेला आहे किंवा मा. महासभेत निर्णय घेतलेला आहे.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य हा बीजेपीचा पॉलीसी मॅटर आहे.

**गजानन भोईर :-**

बीजेपीचे नाव घेऊन बोलू नका. आम्ही जे विचारतो त्याला आपण उत्तर द्या.

**जोजफ घोन्साल्विस :-**

आम्ही विचारू नये का?

**गजानन भोईर :-**

आपण बीजेपीचे नाव घेऊच नका. बीजेपी म्हणुन आम्ही तुम्हाला विरोध करतो का?

**मा. सभापती :-**

ह्याच्यामध्ये विरोधाचा प्रश्न घेत नाही. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मेडिकल असोसिएशनच्या व्यापाऱ्यांनी जेव्हा संपर्क साधला त्यावेळेला त्यांनी सांगितले की आम्हाला मेडिकलच्या जकातीकरीता सुट पाहिजे. ही चर्चा चालू असताना त्याचे ॲग्रीमेंट झाले आणि इन बिटविन त्याच्या मध्ये आपल्याला कंडीशन टाकता आले नाही. त्याच्यामुळे आपण व्यापारीला आश्वासीत केले की, तुम्हाला जकातीमध्ये सुट घेऊ. त्यानंतर जकात नाक्यावर मेडीकलचे औषध आणल्यानंतर त्यांचे जे पैसे होते त्या

पैशावर सुट दिली आणि त्यांचे जे पैसे त्यांना जकात नाक्यावर द्यायचे त्या पैशांचा भरणा आपल्याला करायचा आहे म्हणून आपण हा विषय येथे आणलेला आहे.

**गजानन भोईर :-**

मेडिकलवाले सर्व बीजेपीचे आहेत का?

**मॉरस रॉड्रीक्स :-**

मेडिकल सर्वांचे आहे.

**गजानन भोईर :-**

सभापती साहेबांनी बीजेपीचे नाव घेतले म्हणून मी बोलतोय

**जोजफ घोन्साल्वीस :-**

मेडिकलवाल्यांना सुट दिल्यानंतर व्यापाऱ्यांनी औषधावर किती पैसे उतरविले?

**मा. सभापती :-**

बीजेपीच्या शिष्ट मंडळाने आम्हाला संपर्क साधला होता. जिल्हा अध्यक्ष सन्मा. सदस्य धनराजजी अग्रवाल ह्यांच्या बरोबर काही मंडळी आली होती आणि त्यांनी आम्हाला सांगितले की, मेडिकलमध्ये आपण आम्हाला सुट द्या.

**गजानन भोईर :-**

तो सुट बाबतचा विषय आपण स्थायी समितीमध्ये घेतला का, मा. महासभेत घेतला?

**मा. सभापती :-**

सुट घेतली का नाही घेतली, त्याची माहिती मागवतो. परंतु, ती महिती घेताना ह्याच्या विषयी काय करायचे असे मी तुम्हाला विचारतो. जेव्हा आपल्याच लोकांनी सुचविले होते की मेडिकलवाल्यांना सुट द्यावी.

**गजानन भोईर :-**

आम्ही महानगरपालिकेचे नुकसान कसे करणार, भरणा करून तुम्ही जर स्थायी समितीमध्ये पहिले सुट दिले असेल तर ते आम्हाला सांगा.

**मा. सभापती :-**

ते त्यांच्या ॲग्रीमेंटमध्ये आले नाही.

**गजानन भोईर :-**

कोणाच्या ॲग्रीमेंटमध्ये?

**मा. सभापती :-**

टेक्नीकली त्यांच्या अँग्रीमेंटमध्ये ते आले नाही. जकात ठेकेदारांच्या ॲग्रीमेंटमध्ये टेक्निकली ती सूट आली नाही. ती सुट न आल्या कारणाने आपल्या महापालिकेला भुर्दंड भरावा लागणार आहे. जर आपले व्यापारी ते भरत नसेल तर आपल्याला भरावेच लागणार.

**गजानन भोईर :-**

ते ह्याच्यामध्ये आहे ना की महानगरपालिकेने त्याचा भरणा करावा.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

नाही, आपल्याला काय भरणा करायचा नाही.

**गजानन भोईर :-**

दिलेले आहे.

**रिटा शाह :-**

महानगरपालिका कशी भरणा करायचा नाही.

**गजानन भोईर :-**

आपण जे टेडर दिलेले आहे त्याच्यावर

**रिटा शहा :-**

लोकांचे पैसे आपल्याकडे आहे. आपण कसे पैसे भरणार.

**जोजफ घोन्साल्विस :-**

आणि स्थायी समिती त्याला का मंजूरी देणार?

**रिटा शाह :-**

भरपूर असोसिएशन आहे. सर्वच असोशिएशनचे असे येणार.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

त्याला आपण दहा व्हॅरायटीवर दर वाढवून दिलेले आहे, त्याचा आपल्याला तो मोबदला देतो का? तो देऊ शकत नाही. एका मेडिकलमध्येच दर कमी केलेला आहे. त्याची भरपाई आपण का द्यायची आणि जे त्याला वाढीव दिलेले आहे त्याचा आपल्याला देतो का?

**प्रेमनाथ पाटील :-**

बरोबर आहे, त्याचे तिथे इक्वल होत असेल.

**मा. सभापती :-**

व्यापारीकडून वसूल केला जाईल.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

व्यापरीकडुन कसे वसूल केले जाईल?

**कैलासबेन जानी :-**

साहेब, आपण व्यापारीकडून कसे वसूल करणार?

**मा. सभापती :-**

ॲग्रीमेंटमध्ये ह्याची तरतुद नाही आहे.

**रिटा शाह :-**

मग आपण व्यापारीकडून कसे वसूल करणार, जेव्हा तुमच्या कायद्यामध्येच नाही.

**मा. सभापती :-**

आपण काहीच करून द्यायचे नाही. त्याला त्याचे बघू द्या. त्याला काय करायचे.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

आपण त्या ठेकेदाराला नऊ जागेवर दर वाढवून दिलेले आहे. त्याचा मोबदला नगरपालिकेला मिळतो का?

**मा. सभापती :-**

दर वाढ आपण करून दिलेली आहे.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

दर वाढ आपण करून दिली आहे पण त्याचा मोबदला त्याला झालेला आहे.

**मा. सभापती :-**

दर वाढ देऊन आपण त्याचा पर्याय बजेटला दाखवला आहे.

**मिलन पाटील :-**

दर वाढ देतो तेव्हा आपण त्याचे एक नुकसानही सांगतो की, ह्याच्या दरवाढ माफ करा. दहा आयटमवर दर वाढवून देतो. तेव्हा आपण एकावर वाढ माफ करा सांगतो.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य ही पक्षाची पॉलिसी आहे. पक्षाच्या विरोधात बोलू नका.

**मिलन पाटील :-**

असे असेल तर आम्ही निघून जातो. आम्ही बोलायचे नाही का, ह्यात पक्षाची पॉलिसी काही नाही. नाहीतर आम्ही निघून जातो. आम्हांला काय बोलयचेच नाही.

**मा. सभापती :-**

पक्षाच्या पॉलिसीप्रमाणे त्याला सुट दिली आहे.

**मिलन पाटील :-**

तुम्ही याबाबत सभा घेतली का?

**जोजफ घोन्सालवीस :-**

पक्षाच्या पॉलीसी प्रमाणे नगरपालिका चालवतो का?

**मिलन पाटील :-**

आपण असे कसे पक्षाची पॉलिसी बोलतो

**मॉरस रॉड्रीक्स :-**

नाकाडी साहेबांचे ह्यावर अभिप्राय विचारा.

**मिलन पाटील :-**

आपण सभा घेतली का? अशी पक्षाची पॉलिसी झालेली आहे आपण पक्षाच्या सन्मा. सदस्यांना विचारा. त्यांना माहिती आहे का?

**मा. सभापती :-**

मी तुम्हाला माहिती करून दिली.

**मिलन पाटील :-**

तुम्हाला माहिती आयत्यावेळेला करून दिली.

**मा. सभापती :-**

तुम्हाला ॲट प्रेझेंट माहिती करून दिली. आपल्याला जे बोलायचे असेल ते आपण बोला.

**मिलन पाटील :-**

असा विषय आहे, असे आपण कॅबिनमध्ये बोलावून सांगायला पाहिजे.

**मा. सभापती :-**

मी तुम्हाला ॲट प्रझेंट माहिती करून दिली.

**मिलन पाटील :-**

आम्ही बोलायचे नाही, म्हणजे तोंड बंद करून बसायचे का?

**मॉरस रॉड्रीक्स / सुर्यकांत भोईर :-**

सदरचा विषय नामंजूर करावा.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य सुर्यकांत भोईरजी आपण नामंजूर विषय बोलू नका. मी दोघांना बोलतो. तुम्ही नामंजूर बोलू नका.

**मिलन पाटील :-**

बोलायचे नाही, बोलायचे नाही म्हणजे काय? तुम्ही आम्हाला बोलूच देणार नाही का? तसे सांगा. राजीनामा हवा असल्यास राजीनामा घ्या. आम्हाला त्याच्याने काय फरक पडणार नाही.

**मा. सभापती :-**

आपण असे अवांतर का बोलतो?

**मिलन पाटील :-**

तुम्ही बोलता बोलू नका म्हणजे ह्याचा अर्थ काय? बोलायचे नाही का अजिबात आपण ऑडीटर या विषया बाबत विचारा.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

सभापती साहेब, आपण ऑडीटर साहेबांना विचारा की परत घेऊ शकतो का? नाहीतर सर्व स्थायी समितीवाल्यांना पैसे भरायला लागतील.

**मिलन पाटील :-**

आर्थिक नुकसानीला आम्ही जबाबदार राहणार नाही.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

एकदा टेंडर झाल्यानंतर त्याला आम्ही काही करू शकत नाही.

**मिलन पाटील :-**

आर्थिक नुकसानीची आम्ही जबाबदारी घेणार नाही.

**गजानन भोईर :-**

महापालिके चे नुकसान आम्ही करणार नाही.

**मिलन पाटील :-**

त्याला कोण जबाबदार राहणार उत्तर कोण देणार? ठाणे महानगरपालिकावाले असेच पोहचले. त्यांच्याकडून गर्व्हरमेंटने वसुली करून घेतली आहे.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

एकदा टेंडर दिल्यानंतर त्याच्यात आपण त्यांना सुट देऊ शकतो का ?

**जोजफ घोन्सालवीस :-**

मा. महासभेत मंजूरी घेतल्यानंतर

**रिटा शाह :-**

सर्वांत पहिला प्रश्न आहे की, मेडिकलचे आपण माफ केलेले आहे का? कमिटीमध्ये ठराव झालेला आहे का?

**गजानन भोईर :-**

ठराव झाला असेल तर तसे दाखवा.

**रिटा शाह :-**

ठराव झाला नाही, ॲग्रीमेंटमध्ये तसा त्याचा उल्लेख नाही तर आपण त्यांना कसे देणार आहोत?

**मॉरस रॉड्रीक्स :-**

टेंडर व्हायच्या आधीच आपण ठरवलेले आहे मेडिकलचे टॅक्स माफ करायचे आहे.

**गजानन भोईर :-**

स्थायी समितीमध्ये ठराव घेतला आहे का, औषधावर सुट द्यायचा असे आणि आम्ही ते आता परत कसे कॅन्सल करणार

**रिटा शाह :-**

आपल्याला त्याचा अधिकारच नाही.

**गजानन भोईर :-**

आपल्याला त्याचा अधिकारच नाही.

**मिलन पाटील :-**

नाकाडी साहेब, आपण माहिती द्या, आपण कशाला हात जोडून गप्प उभे आहात.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

नाकाडी साहेब, पैसे कोण तुम्ही भरणार की, आम्हांला भरायला लावणार?

**गजानन भोईर :-**

सगळ्या सदस्यांनी भरायचे का?

**मॉरस रॉड्रीक्स :-**

अन्यथा, हे सर्व स्थायी समितीवर येईल.

**रिटा शाह :-**

सभापती साहेब, साधा असा प्रश्न आहे की, मेडिकल वर सुट द्यायची असा कोणता ठराव झालेला आहे का? नाही असा ठराव झाला असेल तर सुट द्यायला पाहिजे आणि जर ठराव झाला नसेल तर सुट नाही द्यायला पाहिजे.

**गजानन भोईर :-**

ॲग्रीमेंटमध्ये तसा उल्लेख केलेला आहे ना!

**रिटा शाह :-**

ॲग्रीमेंटमध्ये मेडिकलमध्ये सुट द्यावी असा उल्लेख नाही.

**मिलन पाटील :-**

आपण त्या ठेकेदाराला दहा गोष्टीला वाढ दिलेली आहे आणि एका वस्तूत सूट दिली आहे त्याला दहा वस्तूमध्ये प्रॉफिट मिळतो तर तो प्रॉफिट आपल्याला देतो का?

**रिटा शाह :-**

हा विषय फेटाळण्यात यावा. नामंजूर करावा.

**जोजफ घोन्साल्वीस :-**

आमचा देखील विरोध आहे.

**गजाजन भोईर :-**

ते ही नावानिशी.

**प्रेमनाथ पाटील :-**

त्याने भरले नाही तर आपण आपल्या खिशातून भरणार का?

**गजानन भोईर :-**

ते कशासाठी.

**मिलन पाटील :-**

नाकाडी साहेब आपण बोला आपण काही बोलतच नाही. आपण ऑडीटर आहात ना! तुमचा आम्हाला पहिल्यांदा अभिप्राय येऊ दे. आपण तोंड बंद करून कशाला गप्प आहात. ह्याच्यात तुम्हाला आर्थिक नुकसान वाटते का?

**मॉरस रॉड्रीक्स :-**

एकदा सुट दिल्यावर आपण परत त्यांना सुट देऊ शकतो का?

**मा. सभापती :-**

मा. महासभा दि. २५/२/२००४ रोजी हा ठराव झालेला आहे. त्याच्यामध्ये पन्नास टक्के सुट द्यायचे ठरले आहे.

**मिलन पाटील :-**

सुट कशामध्ये?

**मा. सभापती :-**

औषधामध्ये.

**मिलन पाटील :-**

तो ठराव गोषवाऱ्यासोबत दिला पाहिजे होता.

**मा. सभापती :-**

आपण विचारणा केली म्हणून मी माहिती दिली की, मा. महासभेत हा ठराव झालेला आहे.

**रिटा शाह :-**

औषधावर पन्नास टक्के सुट दिलेली आहे असा आपण ठेकेदाराबरोबर केलेल्या ॲग्रीमेंटमध्ये उल्लेख केलेला आहे का? मेडिकलवर सुट द्यायची असे.

**मा. सभापती :-**

सध्याचा दर मा. महासभेला त्यावेळी पन्नास टक्के होते आदी जकात कराच्या बाबतीमध्ये आपण मा. महासभेमध्ये औषधाला जकात माफ केलेली आहे.

**मिलन पाटील :-**

आपण वाढीव दर पण दिलेले आहे, ते बघा.

**मा. सभापती :-**

वाढीव दर दिलेला आहे तो विषय आता येथे होऊ शकत नाही. आपण वाढीव दर वाढवून दिलेले आहे. पण औषधाला जकात माफ केलेली आहे.

**रिटा शाह :-**

आपण मान्य करता की, ते माफ केलेले आहे. पण तुम्ही ॲग्रीमेंटमध्ये त्याचा उल्लेख केलेला आहे का?

**जोजफ घोन्सालवीस :-**

पण आणखीन दहा-बारा वस्तूंवर दर वाढविलेले आहे ना!

**मा. सभापती :-**

दर वाढविले आहे, हा विषय येथे नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

जकात ठेकेदाराने २३/०६/२००४ ते २३/०७/२००४ पर्यंत औषधावर जकात वसुल केलेली आहे आणि २४/०७/२००४ रोजी आपण त्या ठेकेदाराला ठरावाची प्रत दिली की, औषधावरची जकात माफ करावी.

**मिलन पाटील :-**

नाकाडी साहेब, आपण आपला अभिप्राय सभेसमोर द्या. आपण गप्प म्हणजे काय ?

**गजानन भोईर :-**

हा विषय सविस्तर माहितीसह पुढच्या सभेत द्या.

**मिलन पाटील :-**

नाकाडी साहेब, हा तुमच्या अखत्यारिचा प्रश्न आहे. तुम्ही ह्या विषयाची तयारी करून यायला पाहिजे होती आणि आता आमच्यासमोर पान चाळता दहा वेळा आम्ही तुम्हाला विचारतो की, आपला याबाबत अभिप्राय काय आहे ? आपण आपला अभिप्राय काय आहे ते सभेसमोर मांडा.

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब सभा चालू झाल्यानंतर माईक परत परत बंद करायला सांगू नका. सभा चालू झाल्यानंतर आपण माईक बंद करायला त्यांना सांगता, माईक सभा संपल्यानंतर त्यांना बंद करायला सांगा.

**मा. सभापती :-**

आपण माझ्या अधिकारावर आळा घालू नका. जे माझे अधिकार आहेत ते मला वापरू दे.

**गजानन भोईर :-**

विषय चालू असताना, आपण सांगाल की माईक बंद कर म्हणजे आमचे टेपिंग होणार नाही.

**मा. सभापती :-**

जे माझे अधिकार आहेत, ते आपण मला सांगू नका की, काय आहे. माझे अधिकार मला वापरू द्या.

**(सभागृहात गोंधळ)**

**मा. सभापती :-**

बीजेपी पक्षाचे नाव घेऊ नका असे बोलता तर तुम्ही बीजेपी विरहीत येता का?

**गजानन भोईर :-**

नाही, पण आपण सदस्य म्हणून बोला. आपण बीजेपीत येतो. मग आपण यापुढे बीजेपी सदस्य म्हणून बोला.

**मा. सभापती :-**

नाकाडी साहेब आपल्याला माहिती देतील.

**सूधीर नाकाडी :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मा. महासभेने दि. २५/०२/२००४ रोजी ठराव केलेला होता.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

ठरावाच्या बाबत बोलत नाही, आपण त्याला ठेकेदाराला वाढवून पैसे देऊ शकतो का? आपण अॅग्रीमेंट झाल्यानंतर त्यांना परत सुट देऊ शकतो का? ते सांगा.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य मॉरजी रॉड्रीक्स साहेब नाकाडी साहेबांना त्यांना माहिती देऊ द्या. नंतर आपण आपले प्रश्न विचारा.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

एकदा टेंडर दिल्यानंतर आपण पुन्हा सुट देऊ शकतो का?

**मा. सभापती:-**

सन्मा. सदस्य मिलन पाटीलजी ह्यांनी जी माहिती मागितली आहे, ती माहिती ऑडीटर साहेब देत आहेत.

**सुधीर नाकाडी :-**

दि. २५/०२/२००४ रोजी हा ठराव मा. महासभेने मंजूर केलेला आहे. आणि जकात माफीचा विषय त्या सुचीमध्ये यायला पाहिजे होता परंतू तो आलेला नाही. पण जकात ठेकेदाराला दि. २४/०७/२००४ रोजी आपण त्याला कळविलेले आहे. अशाप्रकारे दि. २५/०२/२००४ रोजी झालेला ठराव दि. २४/०७/२००४ रोजी ठराव दिलेला आहे असे गोषवाऱ्यामध्ये स्पष्ट म्हटलेले आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

दि. २४/०६/२००४ ते दि. २३/०७/२००४ पर्यंत त्या ठेकेदाराने रितसर वसुली केलेली आहे. म्हणजे त्याला दि.२४.७.२००४ रोजी ठरावाची प्रत मिळाल्यानंतर त्याने वसुली बंद केली मग प्रश्न कुठे येतो, त्याला परत रिर्टन देण्याचा.

**मिलन पाटील :-**

त्याच्यामध्ये एक कमी केलेले आयटम आहे आणि वाढवलेले आयटम किती आहेत? ते दाखवा

**गजानन भोईर :-**

किती आयटम वाढवले आहेत, त्याचीही माहिती द्या.

**सुधीर नाकाडी :-**

औषधे सोडून इतर सर्व आयटमवर दर वाढवलेले आहे.

**मिलन पाटील :-**

म्हणजे किती टक्के वाढले.

**सुधीर नाकाडी :-**

प्रत्येक ठिकाणी एक टक्का, दोन टक्का अशा प्रकारे वाढवलेले आहे.

**मिलन पाटील :-**

हे किती करोड रूपये झाले? जी वाढीव रक्कम आहे तो ती आपल्याला परत देईल आणि ही रक्कम घेऊन जाईल. असे तो करेल का? तुम्ही त्याबाबत तुमचा अभिप्राय द्या. हे आपण देऊ शकतो का?

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब आपण हे देऊ शकतो का नाही तेवढे सांगा.

**रिटा शाह :-**

जकात कराबाबत जो विषय आणि गोषवारा महानगरपालिकेने आपल्याकडे दिलेला आहे. सदर गोषवारा बघून आपण अशी सूट देऊ शकत नाही असा मी ठराव मांडत आहे आणि सदरचा विषय नामंजूर करण्यात यावा.

**प्रेमनाथ पाटील :-**

सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मिलन पाटील :-**

ऑडीटर साहेबांनी ह्या विषयावर काहीही अभिप्राय दिलेला नाही किंवा प्रशासनाने अभिप्राय दिलेला नाही ह्यांची नोंद घ्यावी. ऑडीटर म्हणून आपण प्रशासनातर्फे आहात आणि तरीही काहीही उत्तर देत नाही.

**रिटा शाह :-**

सचिव साहेब, आपण जो विषय घेता जकात कराबाबत मागे विषय आणला आस्थापनेच्या कामकाजाबाबत विचार विनिमय हे असे मोघम विषय का आणता, सविस्तर विषय का घेत नाही.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्या रिटा शाह मॅडम, विषय घेण्याचे अधिकार माझे आहे. आपण त्याबाबत त्यांना बोलू नका.

**रिटा शाह :-**

ठिक आहे, विषय त्यांना तुम्ही दिला पण शब्द तर हे टाकतात ना! मग जकात बाबत तर काय आहे जकाताबाबत भरपूर असते, तक्रारही असते पण विषय नेमका काय? साहेब, हा तुमचा अधिकार असला तरीही आम्ही ही अशिक्षित नाही. असे मोगम विषयाचा अर्थ काय राहिला आम्ही काय चर्चा केली, काय विचारणा केली.

**मा. सभापती:-**

सन्मा. सदस्या जकात कराबाबत तुम्हाला गोषवारा दिलेला आहे.

**रिटा शाह :-**

गोषवारा नंतर असतो आणि विषय पहिला असतो.

**मा. सभापती :-**

गोषवारा दिल्यानंतर विषय सुस्पष्ट होतो.

**प्रकरण क्र. १५ :-**

जकात कराबाबत.

**ठराव क्र. १७ :-**

सदरच्या विषयावर सविस्तर चर्चा करुन सदरचा विषय फेटाळण्यांत यावा असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्रीम. रिटा शाह.** **अनुमोदन :- श्रीम. कैलासबेन जानी.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १६ चे वाचन केले)

**मा. सभापती :-**

प्रकरण क्र. १६ जकात निविदेतील अटीशर्ती ठरविणेबाबत याविषयाचा गोषवारा नसल्यामुळे सन्मा. सदस्यांच्या संमतीने हा विषय स्थगित करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १६:-**

जकात निविदेतील अटीशर्ती ठरविणेबाबत.

**ठराव क्र. १८ :-**

मा. सभापती सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा विषय पुढील सभेत घेण्याचे ठरविण्यांत आले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १७ चे वाचन केले)

**गजानन भोईर :-**

सदर विषयाचा गोषवारा दिलेला नाही.

**रिटा शाह :-**

सेवा नियम आम्हाला पहिल्यांदा अभ्यास करायला द्या.

**मा. सभापती :-**

आपण सर्व अभ्यासू आहोत. त्यामुळे अभ्यासाला पुस्तक हे पाहिजे. त्याकरिता मा. महासभेपुढे हा विषय जाण्याअगोदर आपण हा विषय येथे याकरिता घेतला की, मिरा भाईंदर महानगरपालिकेतील अधिका-यांचे प्रमोशनबाबत प्रत्येक वेळेला विषयाची जी आस्था दाखवली म्हणून हा विषय येथे घेतलेला आहे. हे जे संपूर्ण पुस्तक आपल्याकडे आलेले आहे त्या पुस्तकाची कॉपी आपल्यापर्यंत पोहचली पाहिजे

आणि त्याचा अभ्यास आपल्याला करता आला पाहिजे. म्हणून याविषयाची माहिती दिल्यानंतर आणि गोषवारा आल्यानंतर आपण हा विषय पुढच्या सभेत घ्यावा.

**मिलन पाटील :-**

ह्या वेळेला विषय आहे ना, मग त्यांनी विषय घेण्यापूर्वी पुस्तक का दिले नाही. त्यांची तयारी पाहिजे का नाही त्यांनी विषय कसा काय घेतला ?

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटीलजी हा मा महासभेचा विषय आहे. सभापती नात्याने मी प्रशासनाला विनंती केली की, हा विषय स्थायी समितीसमोर आणा. प्रशासन हा विषय स्थायी समितीसमोर ना आणता मा. महासभेसमोरच मांडत होते. आपण हा विषय घेतला त्यामुळे इनप्लेट तेवढे सिस्टम अव्हेलेबल नव्हती कारण ते नसल्याकारणाने त्यांनी सांगितले की, सर्व विषय एकत्र देतो आणि पुढच्या वेळेला सविस्तर विषयाची माहिती घेऊन विषय समोर ठेवण्यात येईल. परंतु हा आपला विषय नसताना आपण आपल्याकडे आणले आहे.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

सभापती साहेब, आपले जे जुने अधिकारी आहेत त्यांनाच आपण आधी प्रमोशन द्यावे. नंतर दुसरी भरती करावी.

**गजानन भोईर :-**

माहिती मिळू दे की, असे कोण कोण अधिकारी आहेत.

**मा. सभापती :-**

कोणाला प्रमोशन द्यावे आणि कसे दिल पाहिजे त्यांचे हे भरतीचे सेवानियम बनवले आणि ते नियम आपण आपल्याकडे का आणले, तर त्याचा आपल्याला सखोल अभ्यास करता येईल आणि त्या सखोल अभ्यासाव्दारे त्यालोकांबद्दल जी तुमची भावना आहे तिच आमची सर्वांची भावना आहे. जे जुने अधिकारी आहेत त्यांना न्याय मिळाला पाहिजे त्याकरिता आपण हा विषय येथे आणलेला आहे.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

ते सर्व करायचे काम आपल्या हातातच आहे. ते कमिशनर साहेबांच्या हातात नाही. आपण स्थायी समितीचे सभासद आहोत आणि जे काही करायचे आहे ते आपण करू शकतो. भरती करायची किंवा नाही करायची. बाहेरचे आणून त्यांना ए बी सी डी माहित नसणार ते कसले ऑफिसर होणार आहेत?

**मा. सभापती :-**

त्याकरिता आपण हा विषय येथे आणलेला आहे.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

म्हणून आपण मी सांगतो त्या पध्दतीने हा विषय मंजूर करा.

**रिटा शाह :-**

साहेब पुढच्या सभेत आपण फक्त गोषवारा नाही तर पुस्तक द्या.

**मा. सभापती :-**

सर्व सन्मा. सदस्यांना पुस्तके देण्यात येतील. पण त्याच्यावर सखोल अभ्यास करून तो विषय रितसर पुढच्या सभेत आणू.

**कैलासबेन जानी :-**

सभापती साहेब, जेव्हा आपण पुढच्या सभेत हा विषय आणाल तेव्हा सगळयांची नावे द्या.

**रिटा शाह :-**

सेवा ज्येष्ठता यादी आणि पुस्तके आम्हाला देण्यात यावी.

**मिलन पाटील :-**

मनाळे साहेब, तुमच्याकडे प्रशासन आहे. एवढा उशिर का? आज दोन महिने आम्ही ऐकतो. तुमच्याकडे कोण अधिकारी नेमले आहेत तरी एवढया महत्वाच्या विषयावर तुमच्याकडे वेळ नाही.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य ह्याबाबत मी आपणाला उत्तर दिले आहे. हा विषय स्थायी समितीस तो नव्हता आपण हा विषय घेतला आहे आणि ही मा. महासभेची पॉवर आहे आणि हा विषय आपण चर्चेला घेतलेला आहे. प्रशासनाला विनंती केली की, हा विषय स्थायी समिती समोर घ्या आणि विषय घेतल्यानंतर सन्मा. सदस्यांना पुस्तके देण्यात येतील म्हणून या विषयाला अग्रक्रम लावला आणि विषय घेतला. प्रशासनाने ह्याच्यात कुठेही हलगर्जीपणा केलेला नाही असे सांगायचे आहे.

**प्रकरण क्र. १० :-**

सेवाप्रवेश नियम तयार करून मा. महासभेस मान्यतेसाठी सादर करणे.

**ठराव क्र. १९ :-**

मा. सभापती सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा विषय पुढील सभेत घेण्याचे ठरविण्यांत आले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य केशव रामभाऊ घरतजी ह्यांचे पत्र येथे प्राप्त झालेले आहे. घोडबंदर येथील पाण्याच्या टाकीचा निविदा प्रस्ताव परत स्थायी समितीसमोर ठेवणेबाबत असा विषय सभसमोर आलेला आहे आणि मागच्यावेळेला डी. एस. आर रेट जास्त होते १९.२३ टक्के म्हणून हा विषय आपण पुढच्या सभेत घेण्याचे सांगितले होते. तो त्या सभेत नामंजूर झाला होता. तरी सन्मा. सदस्यांचे विनंतीपत्र आलेले आहे. त्यांच्या पत्राचा आपण स्विकार केलेला आहे.

**मिलन पाटील :-**

सभापती साहेब, मला आर्थिक बाबीबाबत प्रश्न विचारायचा आहे, तो प्रश्न मी विचारू शकतो का?

**मा. सभापती :-**

आपला प्रश्न विचारा.

**मिलन पाटील :-**

आम्हाला अशी माहिती मिळालेली आहे की, आपल्याला जी सरकारी ग्रँट येते त्या ग्रँटमधून पाच-सहा कोटी रूपये आपल्या कलेक्टरने डायरेक्ट कापून घेतलेले आहे. तर याबाबत आपल्या प्रशासनाला काही माहिती आहे का, आणि प्रशासनाने त्याबाबतीत काय कार्यवाही केली किंवा काय कार्यवाही करणार आहे. आज सहा कोटी रूपये लगेच गेले. त्यामुळे बजेट ही कोलमडून जाईल ही बातमी खरी आहे का ?

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य प्रशासन ह्याच्यावर दखल घेण्याअगोदर सन्मा. सभापती साहेबांनी ही गोष्ट पालकमंत्री ह्यांच्या निदर्शनास आणलेली आहे.

**मिलन पाटील :-**

असू दे ही स्थायी समिती आहे. बजेट आपण बनवतो जर बजेट कोलमडले तर आपले नाक कापेल.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटीलजी, ज्यावेळेला महानगरपालिकेला रस्त्याचे अनुदान शासनाकडून प्राप्त होते. तर ते ब-याच वेळेपासून पेन्डींग होते आणि दोन कोटी, तीन कोटी, एक कोटी असे मिळत असते. तर आपले ब-याच वेळेपासून पेन्डींग आहे. यासंदर्भा मध्ये मागच्या वेळेला नगरभवनची जी जागा आहे. ह्या जागेविषयी मा. कलेक्टर साहेबांनी आपल्याबरोबर पत्रव्यवहार केला की, ह्या जागेचे पैसे आपण आम्हाला देऊ करा आणि असे अनेक पत्र दिल्यानंतर त्यांनी आपल्याला अनेक गोष्टीच्या बाबतीत सांगितले की, त्याच्यामध्ये आपण वाचनालय अन्य बाबी चालवता आणि व्यावसायिक रूपावर आपण सभागृह भाडयाने देता असे कलेक्टर साहेबांनी आपल्याला पत्र दिले. त्या पत्रावर आपण त्यांना सांगितले की, डेव्हलपमेंट प्लानमध्ये व्हायच्या अगोदर नगरभवन उभे झाले होते. त्यामुळे ते तिथे दाखवण्याचा प्रश्न येतच नाही आणि ह्याठिकाणी तलाठी कार्यालय ही सुरू आहे आणि ज्या फॅसिलिटी आहेत, वाचनालय आणि स्पोर्टसच्या ह्याही त्यांच्या निर्दशनात आणल्या व त्यांना सांगितले की, आम्ही पैसे तुम्हाला देऊ करणार नाही असा पत्रव्यवहार प्रशासनाने सन्मा. आयुक्त शिंदे साहेबांनी ब-याच वेळा केला आणि तसे त्याचे कॉरसपॉन्डस केल्यानंतर आम्ही हा प्रश्न पालकमंत्र्याकडेसुध्दा घेऊन गेलो होतो. पालक मंत्र्याना सांगितले की, नगरभवनची जागा ही लोकांसाठी आहे. आमच्यासाठी नाही. त्यामुळे ह्या जागेचा प्रश्न येतच नाही. त्यावेळेला श्री. जंत्रेसाहेब जे सन्मा. कलेक्टर सो. आहेत तेही उपस्थित होते आणि ज्यावेळी येथे जनता दरबार भरला होता त्यावेळी महाराष्ट्र टाईम्समध्ये पत्र आणि अशी बातमी आली होती की, ह्या जागेचे पैसे अनुदानाच्यामार्फत वळते करण्यात आलेले आहे. त्यावेळी मी त्यांना ताबडतोब जनता दरबाराच्या मार्फत पत्र दिले की, अश ापध्दतीने ही जागा आरक्षणात दाखविण्यात आली नाही कारण आरक्षणात जी जागा दाखवतो त्याचे पैसे लागत नाही. पंरतु नगरभवन हे डी. पी. सॅक्शन व्हायच्या अगोदरचे होते म्हणून ते असल्याकारणाने त्यांनी आपल्याकडे पैशांची मागणी केली होती म्हणून कायद्याच्या अनुषंगाने आम्हाला सुट द्यावी असे आपण त्यांना विनंती केली परंतु, त्यांनी

ऐकले नाही आणि त्यांनी डायरेक्ट पैसे वळते करून घेतले त्या संदर्भामध्ये आयुक्त साहेबांबरोबर सन्मा. पालक मंत्री ह्यांच्या बरोबर असताना त्यांना मी एक पत्र दिलेले आहे आणि पत्र दिल्यानंतर मंत्रालयात शिलोत्र्याची एक सभा लावण्यात आली होती. त्यावेळी श्री. जंत्रे सो. स्वतः मला भेटले आणि त्यांच्यासोबत मी अर्धा तास चर्चा केली की, मिरा भाईंदर महानगरपालिका ही बजेटच्या मानाने अतिशय लहान महानगरपालिका आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका भिंवडी ठाणे, मुंबईच्या बाजूला असल्याकारणाने तुम्हाला असे वाटते कीही मोठी महानगरपालिका आहे. २५८ कोटीची महानगरपालिका आम्ही बजेटमध्ये देतो. भांडवली बजेट ऐंशी कोटीच्या आसपास आहे. त्यामुळे आम्हाला विकास काम करताना, खर्च करताना आम्हाला नाकी नऊ येते आणि आम्हाला सुविधा उपलब्ध करता येत नाही आणि आम्ही ज्या सुविधा उपलब्ध करतो ते आमच्या आस्थापनेचा खर्च आहे. तो खर्च सतरा टक्के करतो आणि उरलेला खर्च आम्ही ह्या नगरपालिकेच्या विकासाकरिता करतो. अशी आमची महानगरपालिका आर्थिक बाब आहे. त्याचा आपण विचार करावा असे त्यांना आम्ही प्रत्यक्षारित्या सांगितले आणि प्रशासनाचा पूर्ण पत्रव्यवहार त्या बाबतीमध्ये सुरू आहे. असे जे पैसे त्यांनी वळते केले ते आदरणीय पालकमंत्री ह्यांच्याकडे तो प्रस्ताव प्रस्तावित आहे आणि त्यांना जनता दरबारामध्ये पत्रही दिलेले आहे. त्याप्रमाणे आपल्याना अपेक्षित उत्तर येईल. दुसरी गोष्ट अशी की, नगरभवनचा हॉल कमर्शियल रूपाने भाडयाने दिलेला आहे. त्या पध्दतीने जर पुर्ण पैसे दिल्याने ही जागा आपल्या मालकीची होईल उतारा फिरवून घेतला पाहिजे आणि हा उतारा फिरवून घेतल्यानंतर आपल्याना जे देणे मिळेल, जर आपण त्याचा व्यावसायिक रित्या जर त्याचा विचार केला त्या संकुलाचा आणि ते व्यावसायिक संकुल केले तर त्या संकुलातून माहितीप्रमाणे दहा कोटी रूपये मिळायला अपेक्षित आहे असाही विचार एका बाजूने केलेला आहे. परंतु बजेटवर त्याचा प्रभाव होणार आहे. त्यादृष्टीकोनातून आपला पत्रव्यवहार सुरू आहे आणि पालकमंत्र्याकडून जर न्यायाचीच दाद मिळाली तर आपल्याला पाच कोटी वळते मिळेल कारण ते जे पाच कोटी रूपये त्यांनी घेतले, ती सहा कोटीची जागा आहे आणि पाच कोटी वळते केले तर ते वळते करताना एकत्र रक्कम येणार ती रक्कम केली नाही. काही वर्ष ते पेन्डींग होते ते त्यांनी घेतलेले आहे. परंतु, आम्हाला विकास कामाकरिता फरक पडेल अशी त्यांना पूर्णपणे विनंती पालकमंत्र्यासोबत केली. ह्या गोष्टीचा आपण पूर्ण सारासार विचार केला आणि प्रशासन त्याबाबती अगदी अग्रेसर आहे आणि त्यांचा पत्रव्यवहार संपूर्णपणे चालू आहे आणि ह्यानंतर पुढेही मी श्री. जंत्रे साहेबांना मंत्रालयात जी वाच्यता केलेली आहे आणि पत्रव्यवहार केलेला आहे त्या दृष्टीकोनातून त्याचा पुन्हा फॉलोअप प्रशासनाच्या मार्फत करणार आहोत.

**मिलन पाटील :-**

साहेब, आपण ही जी लेन्दी प्रासीजर केली. कलेक्टर सो. आणि आयुक्त सो. एका लेव्हलचे आहेत आणि कलेक्टर साहेबांना जास्त पॉवर आहे, ते ठिक आहे. परंतु कलेक्टरच्या वरसुध्दा शासन आहे की नाही, तर आपण ३७ खाली जर प्रस्ताव पाठवला असता तर एवढी आवश्यकता काय? घनकचऱ्याचे ताबडतोब शासनाने आपल्याला दिले ना! तर आज सहा कोटीची एवढीशी आपली महानगरपालिका आहे. बजेट लहान आहे. ३७ खाली पत्रव्यवहार करायचा. आपण हे असे पत्रव्यवहार कशाला करायचे? ही जी जागा आहे, ती महानगरपालिकेच्या अखत्यारीतली जागा आहे ती आपली आहे. आपल्याला कुठेही जागा पाहिजे तिथे कुठेही शासनाची जागा घेऊ शकतो. पण ३७ खाली प्रस्ताव पाठवल्यानंतर शासन आपल्याला का देणार नाही. स्वतः हिताकरिता कोण घेत नाही. आपण ३७ खाली पाठवायला पाहिजे होते. हा पत्रव्यवहार कशाला करत राहायचे ?

**मा. सभापती :-**

साहेब ३७ खाली जागा येत नाही. कारण आपण अगोदर ३७ खाली ही जागा प्रस्तावित केली होती आणि त्या अगोदर नगरभवन बांधले असे कलेक्टर सो. सांगितले. ३७ खाली जागा झाली नाही आणि ३७ खाली होऊनही प्रशासनाकडे तो प्रश्न प्रलंबित राहिला असता म्हणून आता मंत्रालयाच्या मार्फत आपण करतोय आणि पालकमंत्री हे प्रशासनच आहे, शासन आहे त्यांच्याकडे आपण प्रश्न ठेवलेला आहे. काय उत्तर येते ते बघू या अन्यथा खाली तो विषय ठेऊ या.

**मिलन पाटील :-**

३७ खाली प्रस्ताव पाठवायला पाहिजे होता. ही लेन्दी प्रोसिजर झाली ३७ खाली ताबडतोब होईल. शासन जागा का देणार नाही? आता जसे घनकचऱ्यासाठी ताबडतोब जागा दिली ना! आपली एवढी आर्थिक परिस्थिती आहे तर शासनाकडून पहिल्यांदा ह्याचा पाठपुरावा करायला पाहिजे.

**केशव घरत :-**

सभापती महोदय, जुन महिन्याच्या पहिल्या आठवडयात आपल्याकडे जनता दरबार लागणार आहे त्या जनता दरबारात आपण सगळे पालकमंत्री साहेबांबरोबर बोलून घेऊ या.

**मा. सभापती :-**

या विषयाबाबत पालकमंत्री साहेबांबरोबर स्वतः मी आणि आयुक्त साहेबांनी चर्चा केली आहे.

**केशव घरत :-**

महानगरपालिकेला हे पैसे परत कसे मिळतील.

**मा. सभापती :-**

त्याबाबत पत्रही दिले आहे व चर्चा ही झाली जनता दरबारानंतर मंत्रालयात कलेक्टर साहेबांबरोबर त्यांची चर्चा झाली म्हणजे तो जो प्रस्ताव आहे. तो प्रस्ताव चर्चेमध्ये आलेला आहे.

**मिलन पाटील :-**

साहेब, बजेट हे तुम्ही बनविता आणि बजेटच्या अमंलबजावणीची जबाबदारी ही तुमची आहे. मी तर असे सांगतो की सर्व स्थायी समिती सभासदांना असे पत्र द्यावे की, जर तुम्ही लवकर निर्णय घेतला नाही तर आम्ही सर्व स्थायी समितीचे सदस्य उपोषणाला बसू शासनाला दया आज पाच कोटीचा प्रश्न आहे. बजेटवर त्याचा किती परिणाम होई हे असे आपण सांगा. आम्ही तुमच्या बरोबर उपोषणाला बसायला तयार आहे. कलेक्टर साहेबासमोर किंवा शासनासमोर जाऊन बसू की, आपण जर आम्हाला ह्यांचे उत्तन दिले नाही तर आम्ही समितीची एकही सभा लावणार नाही आणि आम्ही सर्व उपोषणाला बसू असे तुमचे खणखणीत ताबडतोब पत्र द्या. आम्ही त्याचा ठराव मांडतो. हवे असल्यास ठराव पाठवून द्या. तुमचे पत्र पाठवून द्या.

**मा. सभापती :-**

ठराव नको आपण पत्रव्यवहार केलेला आहे.

**मिलन पाटील :-**

आपण पत्र द्या. आपल्या पत्राला आमचे अनुमोदन आहे. आम्ही तुमच्याबरोबर उपोषणाला बसायला तयार आहे. आज पाच कोटीचा प्रश्न आहे. आपल्या महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती काय होईल.

**मा. सभापती :-**

साहेब, ह्याच्याअगोदर आपली सभा झाली याबाबत झाली होती.

**मिलन पाटील :-**

आम्हाला माहिती नाही.

**मा. सभापती :-**

आम्हाला माहिती मिळाली म्हणून आम्ही विषय घेऊन सभा घेतली. सर्व उपस्थित सदस्यांचे आभार मानून आमची सभा संपल्याचे जाहिर करत आहे.

**सभा संपल्याची वेळ :- सकाळी ११.४५ मि.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**